AKOLE HEALTH CARE PVT. LTD.

# आरोग्य सेवेची नवी ओळख – डॉ. प्रकाश वाकचौरे यांचे अकोले हॉस्पिटल




## अक्षय तृतीया व वर्धापन दिन ०४


निमित्त

सर्व नागरिकांना, हितचिंतकांना आरोग्यमय

शुभेच्छा

**डॉ. प्रकाश पंढरीनाथ वाकचौरे** (मॅनेजिंग डायरेक्टर)

**सौ. रूपाली प्रकाश वाकचौरे** (मॅनेजिंग डायरेक्टर)









### उपलब्ध सुविधा

- मुख्यमंत्री सहाय्यता निधी.
- बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबियांकरता बांधकाम योजनेअंतर्गत मोफत शस्त्रक्रिया.
- आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत 2399 उपचार व शस्त्रक्रिया प्रत्येक कुटुंबास प्रतिवर्षी पाच लाखापर्यंत आरोग्य संरक्षण.
- मेडिक्लेम कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.

- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- आधुनिक C ARM मशीन
- सांधा रोपण शस्त्रक्रिया
- मुतखड्याचे ऑपरेशन जनरल सर्जरी
- हाडांच्या शस्त्रक्रिया
- मणक्याच्या शस्त्रक्रिया
- नॉर्मल व सिझरियन डिलिव्हरी
- लहान मुलांचे ऑपरेशन
- आय सी यु एन आय सी यु
- अपघात विभाग



अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर ग्रामीण रुग्णसेवेचा ११ वर्षांचा यशस्वी प्रवास तसेच अकोले हॉस्पिटलचा चौथा वर्धापन दिन संपन्न होत आहे.

ग्रामीण भागात काम करत असताना डॉ. प्रकाश वाकचौरे यांनी २०११ रोजी दापूर, तालुका सिन्नर येथे जनरल प्रॅक्टिस सुरू केली. प्रचंड लोकसंपर्क व कामाची आवड असल्यामुळे त्यांनी दापूर येथे तीन वर्षे सेवा दिली. त्यानंतर मूळगाव परखतपूर असल्यामुळे अकोले येथे हॉस्पिटल सुरू करण्याचा निर्णय घेतला. २०१४ रोजी 'डॉ. वाकचौरे जनरल हॉस्पिटल'च्या माध्यमातून अकोले येथे रुग्णसेवा सुरू करण्यात आली. यावेळी त्यांनी भांडकोळी हॉस्पिटल येथे रात्रपाळीत रेसिडेंट मेडिकल ऑफिसर म्हणून नऊ वर्षे काम केले. या काळात प्रत्येक रुग्णाला सेवा देत, त्यांच्या सुखदुःखात सहभागी होत दिवस-रात्र काम करून लोकांचा विश्वास संपादन केला.

काम करत असताना अकोले येथे सुपर स्पेशालिस्ट डॉक्टरांची ओपीडी सुरू करण्याची कल्पना त्यांच्या मनात होती. २०२२ मध्ये अकोले हॉस्पिटलच्या माध्यमातून ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली आणि ती यशस्वी केली. अकोले येथे प्रथमच सुपर स्पेशालिस्ट सेवा सुरू करण्यात आली. सध्या या हॉस्पिटलमध्ये सर्जिकल ऑर्थोपेडिक सर्जन, न्यूरोसर्जन, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी, गॅस्ट्रोस्कोपी, एंडोस्कोपी, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, लहान मुलांच्या शस्त्रक्रिया, दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया, डिलिव्हरी व सिझेरियन, पोटाच्या, हाडांच्या, मणक्याच्या व मुतखड्याच्या शस्त्रक्रिया अशा विविध उपचार व सुविधा उपलब्ध आहेत.

ग्रामीण भागात आरोग्यसेवा ही आजही अनेकांसाठी आव्हानात्मक बाब मानली जाते. मात्र सेवा हीच खरी पूजा या भावनेतून सुरू झालेल्या अकोले हॉस्पिटलने या समजुतीला न्याय देत चार वर्षांचा यशस्वी प्रवास पूर्ण केला आहे. विशेष म्हणजे हा वर्धापन दिन अक्षय तृतीया या पवित्र दिवशी साजरा होत असल्याने या दिवसाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.



अक्षय तृतीया हा नव्या सुरुवातीचा, सतत वृद्धिंगत होणाऱ्या पुण्याचा आणि सकारात्मक ऊर्जेचा प्रतीक मानला जातो. याच दिवशी सुरू झालेल्या या रुग्णालयाने ग्रामीण जनतेला परवडणारी, दर्जेदार आणि विश्वासार्ह आरोग्यसेवा देण्याचा संकल्प केला आणि त्या दिशेने सातत्याने वाटचाल केली आहे.

रुग्णालयाची स्थापना ही केवळ व्यवसायिक दृष्टीकोनातून नव्हे तर समाजसेवेच्या भावनेतून करण्यात आली. सुरुवातीच्या काळात अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, परंतु चिकाटी, प्रामाणिकपणा आणि सेवाभाव यांच्या जोरावर या रुग्णालयाने आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. आज चार वर्षांत हजारो रुग्णांनी येथे उपचार घेतले असून, हे रुग्णालय त्यांच्या विश्वासाचे केंद्र बनले आहे.

या रुग्णालयात अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांसह सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. २४ तास सेवा, आपत्कालीन उपचार, आयसीयू, प्रसूती विभाग, बालरोग सेवा, मेडिसिन विभाग, सर्जरी विभाग तसेच इतर विविध सुविधा येथे उपलब्ध आहेत. रुग्णांच्या सेवेसाठी म्ब्युलन्स सेवा देखील तत्परतेने कार्यरत आहे. या यशामागे तज्ञ डॉक्टरांची अनुभवी टीम तसेच सेवाभावी परिचारिका व कर्मचारी यांचा मोठा वाटा आहे. येथे येणाऱ्या प्रत्येक रुग्णाची काळजी कुटुंबातील सदस्याप्रमाणे घेतली जाते. रुग्णांशी आत्मीयतेने वागून त्यांना मानसिक आधार देण्याचे कार्यही सातत्याने केले जाते. अकोले मेडिकल फाउंडेशनच्या माध्यमातून सचिव सौ. रूपाली वाकचौरे यांच्या संकल्पनेतून सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवले जात आहेत. मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य जनजागृती अभियान, शालेय विद्यार्थ्यांची तपासणी, विधवा महिलांची तपासणी, वृक्षारोपण तसेच गरजू रुग्णांना आर्थिक मदत अशा अनेक उपक्रमांद्वारे समाजाशी असलेले नाते अधिक दृढ करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील अनेक रुग्णांसाठी अकोले हॉस्पिटल हे आशेचा किरण ठरले आहे. वेळेवर मिळालेल्या उपचारांमुळे अनेकांचे जीव वाचले असून, महिलांसाठी व बालकांसाठी विशेष सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांचा विश्वास दिवसेंदिवस अधिक दृढ होत आहे.



वर्धापन दिनानिमित्त अक्षय तृतीयेच्या दिवशी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मोफत आरोग्य शिबिर तसेच बांधकाम कामगारांसाठी विशेष शिबिर आयोजित करण्यात येणार आहे. यामध्ये डॉक्टर व कर्मचारी यांचा सन्मान तसेच समाजोपयोगी उपक्रमांचा समावेश असेल.

अकोले हॉस्पिटलमध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगार व त्यांच्या कुटुंबीयांसाठी बांधकाम योजनेअंतर्गत हर्निया, मुळव्याध, गर्भपिशवीचे ऑपरेशन, स्त्रियांचे आजार, हाडांचे ऑपरेशन इत्यादी शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध आहेत. यासाठी बांधकाम कार्ड, आधार कार्ड व शिधापत्रिका इत्यादी कागदपत्र आवश्यक आहे. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना सुरू असून, या अंतर्गत २३९९ उपचार व शस्त्रक्रिया तसेच प्रत्येक कुटुंबाला प्रतिवर्ष ५ लाखांपर्यंत आरोग्य संरक्षण दिले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी शिधापत्रिका, आयुष्यमान कार्ड व आधार कार्ड आवश्यक आहे. मुख्यमंत्री सहायता निधीची सुविधा देखील अकोले हॉस्पिटलमध्ये उपलब्ध असून यामध्ये बारा वर्षाच्या आतील मुलांचे ऑपरेशन, सांधा बदल शस्त्रक्रियेसाठी अर्थसहाय्य, त्यासाठी आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला व शिधापत्रिका आवश्यक आहेत.

सर्व कंपन्यांच्या कॅशलेस व रिइम्बर्समेंट सुविधा येथे उपलब्ध आहेत. या हॉस्पिटलमध्ये आतापर्यंत शेकडो शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडल्या आहेत. भविष्यात अधिक आधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे, नवीन वैद्यकीय विभाग सुरू करणे आणि ग्रामीण भागातील आरोग्यसेवा अधिक सक्षम करणे हा रुग्णालयाचा ध्यास आहे. सेवा, विश्वास आणि गुणवत्ता या त्रिसूत्रीवर आधारित अकोले हॉस्पिटलने चार वर्षांचा टप्पा यशस्वीरित्या पार केला असून, पुढील काळातही रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा या भावनेतून कार्यरत राहण्याचा संकल्प दृढ केला आहे.









हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)